CNR No. MHTH120013962022

| | | | | |
|---|---|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०७ | ०३ | २०२२ |
| नोंदणी तारीख | : | ०७ | ०३ | २०२२ |
| निकाल तारीख | : | २६ | ०५ | २०२५ |
| कालावधी | : | ०३व. | ०२म. | १९दि. |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र. ८) बेलापुर यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारी श्रीमती पी. जे. शेटटी यांचे समक्ष)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ९१६/२०२२** **निशाणी क्र. (२९)**

| | |
|---|---|
| | गुन्हा क्र : I १८५/२०२१<br>पोलिस स्टेशन : रबाळे एमआयडीसी |
| तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलिस स्टेशन, रबाळे एमआयडीसी पोलीस ठाणे |
| अधिवक्ता | सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के/श्री. होळकर |
| आरोपी | **करिम चांद सययद**<br>वय- ३१ वर्षे, व्यवसाय- नोकरी<br>रा. साठेनगर, रोड नं २२, संतोषी माता चाळ, ठाणे. |
| अधिवक्ता | आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. के.डी.जाधव |

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | १६-०७-२०२१ रोजी ०८.१५ वाजताच्या सुमारास |
| प्रथम खबरी तारीख | १६-०७-२०२१ |
| आरोपपत्राची दाखल तारीख | ०७-०३-२०२२ |
| आरोपपत्र निश्चित केल्याची तारीख | २४-११-२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | २०-०९-२०२४ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २६-०५-२०२५ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख जर असेल तर | निरंक |

| क्र | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीने केलेले गुन्हे | निर्दोष किंव्हा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्र.सं च्या उद्देशाने खटलेल्या वेळी |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | अटकेचा कालावधी |
| १ | करिम चांद सययद | - | - | भा.द.वि. कलम २७९,३०४ अ , ३३७, सह मो. वा काय कलम १८४, १७७ अन्वये | निर्दोष | - | - |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

**( घोषणा दिनांक २६/०५/२०२५)**

आरोपी हा भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४ (अ), ३३७, सह मो. वा काय कलम १८४, १७७ अन्वये निश्चित केलेल्या दोषारोपाच्या संपरिक्षेसाठी प्रस्तुत खटल्यात सामोरे गेले आहेत.

**अभियोग पक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.**

**०२.** दिनांक १६-०७-२०२१ रोजी ०८.१५ वाजताचे दरम्यान वेलफिनिस कंपनी समोर, महापे ठाणे एमआयडीसी रोड, नवी मुंबई येथे आरोपीने त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल क्र एमएच ०४ एचई ४१६३ ही विरूध्द दिशेने हयगईने, रस्त्याच्या दिसत्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवित नेल्याने समोरून योग्य दिशेने येणारी रिक्षा क्र एमएच ०५ डि झेड ३७०९ हिस आरोपीचे मोटार सायकलची धडक लागून रिक्षा पलटी होवून त्यामागील शिटवर बसलेला फिर्यादी यांचा मेव्हना तुषार किसन होनमाने यास डोक्यास गंभीर दुखापत होवून त्याचे मरणास तसेच स्वत:जखमी होवून दोन्ही वाहनास नुकसान करण्यास कारणीभूत झाला म्हणून फिर्यादी यांनी आरोपी विरुध्द रबाळे पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** सदरच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा क्र. १८५/२०२१ भा.द.वि. कलम २२७९, ३०४ (अ), ३३७, सह मो. वा काय कलम १८४, १७७ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरिक्षक किरण पाटील यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, कागदपत्र हस्तगत केली व तपासपूर्ण करुन आरोपीविरुध्द सदर न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

**०४.** आरोपी यांचे विरुध्द भारतीय दंड विधान संहिता कलम २७९, ३०४ (अ), ३३७, सह मो. वा काय कलम १८४, १७७ अन्वये दोषारोप (नि.०९) निर्धारीत केले. सदर

दोषारोप आरोपीला मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी ते आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

**०५.** प्रस्तुत खटल्यामध्ये सरकारपक्षातर्फे सादर करण्यात आलेल्या पुराव्याअंती आरोपी चे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये निवेदन निशाणी क्र. २८ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपीनी केस खोटी असल्याचा बचाव केला.

**०६.** **<u>युक्तीवाद, मुददे व निष्कर्ष :-</u>** सरकारपक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. आर. एस. सोनटक्के यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. आरोपीतर्फे वकील श्री. के.डी.जाधव यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायीक निकालासाठी उदभवलेले मुददे, त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुददे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, दिनांक १६-०७-२०२१ रोजी ०८.१५ वाजताचे दरम्यान वेलफिनिस कंपनी समोर, महापे ठाणे एमआयडीसी रोड, नवी मुंबई येथे आरोपीने त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल क्र एमएच ०४ एचई ४१६३ ही विरूध्द दिशेने हयगईने, रस्त्याच्या दिसत्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवित नेल्याने समोरून योग्य दिशेने येणारी रिक्षा क्र एमएच ०५ डि झेड ३७०९ हिस आरोपीचे मोटार सायकलची धडक लागून रिक्षा पलटी होवून त्यामागील शिटवर बसलेला फिर्यादी यांचा मेव्हना तुषार किसन होनमाने यास डोक्यास गंभीर दुखापत होवून त्याचे मरणास तसेच स्वत: जखमी होवून दोन्ही वाहनास नुकसान करण्यास कारणीभूत झाला त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम २७९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नाही |
| २ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वर नमुद वेळ, तारीख व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हे बेदकारपणे व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी यांचा यांच्या मेव्हना तुषार किसन यास मागुन धडक देवून त्याच्या मृत्युस कारणीभुत झाला व त्याव्दारे भारतीय दंड विधान कलम ३०४ अ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नाही |
| ३ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वरील नमूद तारखेला, ठिकाणी, वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व अविचाराने व वाहतुकीच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन फिर्यादी यांच्या मेव्हन्यास धडक देवुन अपघात केला व त्यांच्या डोक्यास गंभीर दुखापती होण्यास कारणीभुत झाला व भा.दं.वि. कलम ३३७ प्रमाणे गुन्हा केला? | .... नाही |
| ४ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वर नमुद तारखेस, | ..... नाही |

| | | |
|---|---|---|
| | वेळेस व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील वाहन हे सार्वजनिक रस्त्यावर बेदकारपणे, भरधाव वेगाने व रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालविली व अशाप्रकारे मोटर वाहन कायदा कलम १८४ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | |
| ५ | अभियोग पक्षाने सिदध् केले काय की, वरील नमूद तारखेला, ठिकाणी, वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन हयगयीने व अविचाराने व वाहतुकीच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवुन कायदयाच्या किंवा त्याअंतर्गत केलेल्या नियमांचे व अधिसूचनेच्या तरतुदींचे उल्लंघन केले व अशाप्रकारे मोटर वाहन कायदा कलम १७७ नुसार शिक्षापात्र गुन्हा केला ? | ..... नाही |
| ६ | अंतिम आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## -: कारणमिमांसा :-

### अ. अभियोग पक्ष :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| ०१ | नितीन चंद्रकांत दौलताडे | १३ | फिर्यादी |
| ०२ | अरूण नानासाहेब जिमल | १९ | साक्षीदार |
| ०३ | राजाराम पोपट बरकडे | २३ | साक्षीदार |
| ०४ | राहूल दिलीप देवकते | २५ | साक्षीदार |
| ०५ | किसन शंकर होनमाने | २६ | साक्षीदार |
| ०६ | वैभव किसन होनमाने | २७ | साक्षीदार |

### ब. आरोपीतर्फे साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

### क. न्यायालया कडून साक्षीदार, जर असेल तर :-

| क्र. | नाव | नि.क्र | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलिस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|---|
| | निरंक | | |

**फिर्यादीपक्ष/आरोपी पक्ष/ न्यायालयातील निशाणी क्रमांकांची यादी**

**अ. फिर्यादीपक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १४ | फिर्याद |
| २ | १५ | एफआयआर |
| ३ | २० | घटनास्थळ पंचनामा |

**ब.बचाव पक्ष :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**क. न्यायालय :-**

| क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| ०१ | निरंक | |

**०७.** आरोपी विरुध्दचा भारतीय दंड विधान संहिता २७९, ३०४ (अ), ३३७, ३३८ सह मो. वा कायदा कलम १८४ १७७ अन्वये चा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाला हे सिध्द करणे गरजेचे आहे की,

दिनांक १६-०७-२०२१ रोजी ०८.१५ वाजताचे दरम्यान वेलफिनिस कंपनी समोर, महापे ठाणे एमआयडीसी रोड, नवी मुंबई येथे आरोपीने त्यांच्या ताब्यातील मोटारसायकल क्र एमएच ०४ एचई ४१६३ ही विरूध्द दिशेने हयगईने, रस्त्याच्या दिसत्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून अतिवेगाने चालवित नेल्याने समोरून योग्य दिशेने येणारी रिक्षा क्र एमएच ०५ डि झेड ३७०९ हिस आरोपीचे मोटार सायकलची धडक लागून रिक्षा पलटी होवून त्यामागील शिटवर बसलेला फिर्यादी यांचा मेव्हना तुषार किसन होनमाने यास डोक्यास गंभीर दुखापत होवून त्याचे मरणास तसेच स्वत: जखमी होवून दोन्ही वाहनास नुकसान करण्यास कारणीभूत झाला.

**<u>मुददे क्र. १ ते ५ करीता :-</u>**

**०८.** सर्व मुददे एकमेकांशी संलग्न असुन ग्राहय धरला जाणारा पुरावा हा देखील सारख्याच स्वरुपाचा असल्याने सर्व मुददांचा एकत्रित विचार करणे न्यायोचित ठरते. अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.१ नितीन

चंद्रकांत दौलताडे यांना निशाणी १३ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दि. १६.०७.२०२१ रोजी सकाळी ७.४५ च्या सुमारास ते त्यांच्या मेव्हण्याला रिक्षा चालवणे शिकवण्यासाठी एमआयडीसी रोडला घेउन गेले. तसेच ८.१५ च्या सुमारास पाउस येत असल्याने त्यांनी रिक्षा यु टर्न घेउन कल्पना हॉटेलच्या जवळ पाठीमागे बसायला सांगितले व रिक्षा चालवायला त्यांनी ताब्यात घेतली. सदर वेळेस ऐरोली रोडने जात असताना विरूध्द दिशेने एक लाल रंगाची एम एच ०४ एच ई ४१६३ ही बाईक आली व त्यांच्या रिक्षास धडक दिली त्यामुळे रिक्षा पलटी झाली होती. सदर वेळेस ते रिक्षातून बाहेर पडून त्यांचा मेव्हणा रिक्षातून खाली रस्त्यावर पडलेला होता. त्याला डोक्याला मार लागलेला होता व त्याच्या डोक्यातून रक्त येत होते. त्यांनतर त्यांनी दुसरी रीक्षा करून त्यांना हॉस्पीटलला नेले असल्याचे सांगितले. सदर वेळेस डॉक्टरांनी तपासून मृत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आरोपीचे नाव करीम चंद सययद असे होते. तसेच त्यांनतर त्यांनी तक्रार ( नि क्र १४) दाखल करण्यात आली होती व त्यांनी आरोपीला न्यायालयासमक्ष ओळखले होते.

**०९.** साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान कथन केले की, त्यांच्या मेव्हणा तुषार होनमाने हा १६ वर्षांचा असून त्यांचे सांगणेवरून त्याला रिक्षाचालविणे शिकविण्याकरीता गेला होता. त्यांचा मेव्हणा तुषार होनमाने याच्याकडे रिक्षा चालवण्याचे लायन्स नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांना रिक्षा चालवण्यासाठी लर्निंग लायन्सस काढून दिले नसल्याचे त्यांनी सांगितले नव्हते. सदर रस्त्यावर दोन्ही ठिकाणी स्पीड ब्रेकर आहे त्यामुळे सदर ठिकाणी गाडया वेगाने चालत असतात. तसेच त्यांना खरचटल्याबात मेडीकल सर्टीफिकेट घेतले नसल्याचे त्यांनी सांगितले. सदर साक्षीदाराने मान्य केले की, त्यांनी नुकसान भरपाईकरीता ठाणे मोटार अपघात न्यायालयात अर्ज केला होता.

**१०.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.२ अरूण नानासाहेब जिमल यांना निशाणी १९ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, दि. १६.०७.२०२१ रोजी त्यांना पोलिसांनी रबाळे एमआयडीसी येथे पंचनाम्यासाठी बोलावले होते. सदर वेळेस किरण पाटील हे साहेब असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा (नि क्र २०) तयार करण्यात आला होता. सदर अपघातातील रिक्षाचा क्र ३७०४ असा असून मोटार सायकल क्र ४१६३ असा असून पूर्ण क्रमांक आठवत नसल्याचे सांगितले. तसेच मोटार

सायकलचा रंग हा लाल होता. घटनास्थळी रिक्षा व मोटारसायकल पलटी झालेली असून गाडया एकमेकांना समोरून धडकल्याचे दिसत असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर अपघातात तुषार होनमाने हे मयत झाले असल्याचे त्यांनी कथन केले आहे.

**११.** साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान कथन केले की, सदर अपघाताबाबत त्यांना ७.३०ते ८.०० च्या दरम्यान समजले होते व त्यांनतर ते लगेचच हॉस्पीटलला गेले होते. परंतु सदर ठिकाणी किती वाजता गेले होते हे त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी मान्य केले की, सदरची घटना ज्या ठिकाणी घडली त्या ठिकाणाहून एक रस्ता महापेकडे जात असून मध्ये एक उंच डिवाडर आहे. त्यांनी पुढे मान्य केले की, सदर घटना त्यांनी प्रत्यक्षात पाहिलेली नसून त्यांना घटनास्थळाच्या चतु:सिमा सांगता आलेले नाही.

**१२.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.३ राजाराम पोपट बरकडे यांना निशाणी २३ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांच्या साक्षीत असे कथन केले की, सन २०२१ मध्ये ते कल्याण येथे राहत असून ते रिक्षा चालविण्याचा व्यवसाय असल्याचे त्यांनी कथन केले आहे. दि. १६.०७.२०२१ रोजी ते रबाळे एमआयडीसी येथील वेलफिनीश कंपनीजवळ चहा पीत असतना आवाज आला म्हणून ते व राहूल देवकते तेथे पाहण्याकरीता गेले होते. सदर वेळेस रिक्ष व मोटारसायकलचा अपघात झाल्याचे त्यांना दिसून आले होते. तसेच सदरील परिस्थिती पाहता मोटारसायकल ही महापेच्या दिशेने तोंड करून पडली होती तसेच रिक्षाचे तोंड ऐरोलीच्या दिशेला असल्याचे त्यांनी सांगितले आहे. सदर घटनेच्यावेळी रिक्षाचालक नितीन हा बाजूला उभा असून तुषार हा रिक्षातुन खाली पडलेला त्यांना दिसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनतर तुषारला तसेच मोटार सायकल चालकाला ऐरोली येथील हॉस्पीटलला घेउन जात असताना तुषार हा बेशुध्द अवस्थेत होता. डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केले होते.सदर मोटारसायकलचा क्र एमएच ०४ईएच ४१६३ असा होता तसेच रिक्षाचा क्र एमएच ०५डीझेड ३७०९ असा असल्याचे त्यांनी सांगितले.

**१३.** साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान कथन केले की, सदर ठिकाणी अपघात झाला ते रहदारीचे ठिकाण आहे तसेच त्यावेळी पावसाळ्याचे दिवस होते. त्यांनी सदरची घटना प्रत्यक्षात पाहिलेली नसल्याचे सांगितले. तसेच सदर घटनेबाबत त्यांना नितीनने व आजूबाजूच्या लोकांनी

सांगितले होते. त्यांनी पुढे मान्य केले की, सदर घटनेत नितीनला मार लागला नव्हता. सदर साक्षीदाराचे साक्षीजबाबावरून अपघात झाला हे स्पष्ट होत असले तरी ते नेमक्या कोणाच्या चुकीने व हयगईने झाले हि बाब शाबित होत नाही. तसेच सदर साक्षीदाराचे साक्षीजबाबावरून ते फिर्यादीचे चांगले परिचयाचे असल्याचे स्पष्ट होते.

**१४.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.४ राहूल दिलीप देवकते यांना निशाणी २५ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले आहे की, सन २०२१ मध्ये ते कल्याण येथे राहण्यास होते. दि. १६.०७.२०२१ रोजी नितीन चंद्रकांत दौलताडे यांच्या रिक्षाचा सकाळी ८.१५ च्या सुमारास अपघात झाला होता. सदर वेळेस अपघात झाला असता त्यादरम्यान ते चहापीत होते व त्यांच्या विरूध्द दिशेने एक मोटारसायकल आली व त्याने रिक्षाला धडक दिली असून सदरची रिक्षा पलटी झाली होती. सदर ठिकाणी बरेचसे रिक्षावाले जमा झाले होते. सदर रिक्षामध्ये नितीन व त्यांचा मेव्हणा तुषारला होनमाने होता. त्याच्या डोक्याला लागले असून खूप रक्तस्त्राव होत होता. त्यांनतर नितीन व इतर लोकांनी त्यांना हॉस्पीटलला घेउन गेले होते. सदर मोटारसायकलचा नंबर हा एमएच ०४ एचई ४१६३ असा होता तसेच रिक्षाचा क्र एमएच ०५ डीझेड ३७०९ असा होता. तसेच सदरची घटना त्यांनी स्वत: पाहिल्याचे त्यांनी कथन केले आहे. सदर साक्षीदाराचे साक्षीजबाबावरून त्याने न्यायालयात आरोपी हजर असताना त्याला न्यायालयासमक्ष ओळखण्यास असमर्थतता दर्शविली आहे. साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान त्यांनी मान्य केले की, साक्ष देतेवेळी सदर बाईकचा नंबर हातावर लिहून आणलेला होता.

**१५.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.५ किसन शंकर होनमाने यांना निशाणी २६ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले आहे की, सन २०२१ मध्ये ते ऐरोली चिंचपाडा येथे राहत होते. दि. १६.०७.२०२१ रोजी नितीन चंद्रकांत दौलताडे यांनी सकाळी ९ च्या सुमारस फोन करून त्यांना सांगितले की, रिक्षाचा व मोटार सायकलचा अपघात झाला असून तुषार होनमाने यांना उपचाराकरीता हॉस्पीटलला नेले होते. त्यांनतर डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले होते. सदर वेळेस एका बाईकने रिक्षाला धडक दिली असल्याचे सांगितले. तसेच सदरची बाईक ही विरूध्द दिशेने जात होती. त्यामुळे सदरचा अपघात झाला. जखमी

तुषारच्या डोक्याला मार लागल्यामुळे तो मयत झाला होता. सदर मोटारसायकलचा नं हा एमएच ०४ एचई ४१६३ असा होता तसेच रिक्षाचा क्र एमएच ०५ डीझेड ३७०९ असा असल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच त्यांनी आरोपीस न्यायालयासमक्ष ओळखले होते. साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान कथन केले की, ठाणे न्यायालयात क्लेमसाठी त्यांनी केस दाखल केली आहे. तसेच सदरचा अपघात किती वाजता झाला हे त्यांना नेमके माहिती नाही. त्यांनी पुढे मान्य केले की, सदरची घटना त्यांनी प्रत्यक्षात पाहिलेली नाही.

**१६.** अभियोग पक्षामार्फत आरोपी विरूध्द आरोपी विरूध्द आरोप सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र.६ वैभव किसन होनमाने यांना निशाणी २७ अन्वये तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत असे कथन केले आहे की, सन २०२१ मध्ये ते ऐरोली चिंचपाडा येथे राहत होते. दि. १६.०७.२०२१ रोजी त्यांचा भाउ तुषार किसन होनमाने यांची रिक्षा व मोटारसायकल यांचा अपघात झाल्याने मृत्यू झाला असून सदर अपघातबाबत त्यांना नितीन चंद्रकांत दौलताडे यांनी फोनवरून सांगितले होते. तुषार होनमाने यांना उपचाराकरीता हॉस्पीटलला नेले होते. त्यांनतर डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले होते. सदर वेळेस एका बाईकने रिक्षाला धडक दिली असल्याचे सांगितले. तसेच सदरची बाईक ही विरूध्द दिशेने जात होती. त्यामुळे सदरचा अपघात झाला. जखमी तुषारच्या डोक्याला मार लागल्यामुळे रक्तस्त्राव झाला व तो मयत झाला होता. सदर मोटारसायकलचा नं हा एमएच ०४ एचई ४१६३ असा होता तसेच रिक्षाचा क्र एमएच ०५ डीझेड ३७०९ असा असल्याचे त्यांनी कथन केले आहे. तसेच त्यांनी आरोपीस न्यायालयासमक्ष ओळखले होते. साक्षीदाराने त्याचे उलटतपासादरम्यान कथन केले की, सदरची घटना त्यांनी प्रत्यक्षात पाहिलेली नाही. तसेच त्यांचा मेव्हणा नितीन यांच्या सांगण्यावरून ते आजरोजी साक्ष देत असल्याचे सांगितले.

**१७.** एकंदरीत अभियोग पक्षामार्फत तपासण्यात आलेल्या फिर्यादी साक्षीदार यांची साक्ष जबाबावरुन फिर्याद शाबीत झाली असली तरी त्यांचे साक्षी जबाबावरुन असे दिसून आले की, ते त्यांच्या मेव्हणा याचे वय वर्ष १६ याला रिक्षा शिकविण्याकरीता घेवून गेले होते. त्यांचा मेव्हणा तुषार होनमाने याच्याकडे रिक्षा चालवण्याचे लायन्स नव्हते. तसेच सदर साक्षीदार याने अपघातावेळी तो स्वत: रिक्षा चालवत होता असे कथन केले असून अपघातावेळी रिक्षामध्ये असून देखील त्यांना कोणत्याही प्रकारची दुखापत झाली नाही. सदर ठिकाणाहून कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा तपासी अधिकारी यांनी जाबाब नोंदविला नसल्यामुळे सदर अपघात हा

आरोपीच्याच हयगईने झाला ही बाब संशयापलीकडे जाउन सिध्द झालेली नाही. तसेच सदर प्रकरणात आरोपीच्याच चुकीमुळे अपघात झाला ही बाब तपासी अधिकारी या निष्कर्षाप्रत कसे आले शाबित करणेकरीता तपासी अधिकारी यांनी सदर घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार तपासले नाहीत. अभियोगपक्षामार्फत घटनेची वस्तुस्थिती सांगण्याकरीता तेथे असलेल्या कोणत्याही इसमास तपासण्यात आले नाही.

१८. एंकदरीत अभियोग पक्षामार्फत तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीजबाबावरून सदर अपघाताच्या वेळेस आरोपी त्याचे त्याब्यातील वाहन हयगयीने विरूध्द दिशेने चालवत होता व त्यामुळे त्याचे ताब्यातील वाहनाने फिर्यादी यांच्या रिक्षास समोरून धडक दिली हे देखील कोणत्याही साक्षीदाराने पाहिले असल्याचे अथवा सदर अपघाताच्या वेळेस आरोपीच्या वाहनाचा वेग किती होता. रिक्षा अपधाताच्या वेळी मयत इसम चालवित होता किंवा फिर्यादी चालवत होता. मेव्हणा मयत होतो त्यामुळे प्रत्यक्षात अपघाताच्या वेळी रिक्षा कोण चालवत होते याबाबत शंका निर्माण होते. अभियोगपक्षामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार यांचे साक्षीजबाबावरून सदरचा अपघात झाला हि बाब निर्विवादपणे शाबित होत असली तरी त्यांचे साक्षीजबाबावरून हे फिर्यादीचे परिचयाचे असून त्यांनी प्रत्यक्षात अपघात पाहिला असल्याचे स्पष्ट होत नाही. त्यामुळे त्यांचे साक्षीजबाबवरून नेमका अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला कि रिक्षाचालकाच्या चुकीमुळे झाला हि बाब शाबित होत नाही. तसेच अभियोगपक्षामार्फत घटनास्थळ पंचनामा शाबित झाला असला तरी, घटनेचे ठिकाण, तेथील चतु:सिमा घटनास्थळाची वस्तुस्थिती दर्शविणारा नकाशा अभिलेखसदरी शाबित करण्यात आलेला नाही. अभियोगपक्षामार्फत दाखल करण्यात आलेल्या फोटोग्राफचे अवलोकन केले असतना सदर रिक्षाचे वरच्या बाजूचे नुकसान झाले असल्याचे दिसून येत असून अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे सदर अपघात हा मोटारसायकने समोरून धडक दिली असल्याने झाला असे कथन असून सदर फोटोग्राफचे अवलोकन केले असता सदर रिक्षाचे मोटारसायकलने समोरून धडक दिली असल्याने नुकसान झाले असल्याचे स्पष्ट होत नाही. याउलट रिक्षाची परिस्थीती पाहता सदर रिक्षाचा वेग किती होता याबाबतचा अंदाज लावणे अशक्य आहे. अभियोगपक्षामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार हे फिर्यादीचे मित्र व नातेवाईक अभियोगपक्षामार्फत कोणताही स्वतंत्र साक्षीदार ज्याने प्रस्तुतचा अपघात पाहिला त्यास तपासण्यात आलेले नाही. त्यामुळे सदरचा अपघात हा आरोपी च्या हयगईने, अविचाराने चालवल्यामुळे झाला ही बाब निर्वीवादपणे शाबीत होत नाही.

**२०.** उपरोक्त नमूद कारणमिमांसेचा विचार करता असे निदर्शनास येते की, अभियोग पक्षाने सदरचा अपघात आरोपीच्या निष्काळजीपणामुळे, हयगयीपणामुळे तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन वाहन चालविल्यामुळे घडला ही बाब नि:संशयपणे सिध्द केलेली नाही असे दिसून येते. वास्तविक पाहता, प्रत्यक्षात सदरचा अपघात निश्चित कोणाच्या हयगयीमुळे, निष्काळजीपणामुळे घडला याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच अभियोग पक्षाने आरोपीने वाहतुकीच्या कोणत्या नियमांचे निश्चित कोणत्या प्रकारे उल्लंघन केले याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**२१.** एकंदरीत, अभियोग पक्षाने भा.द.वि. २७९, ३०४ (अ), ३३७, सह मो. वा काय कलम १८४, १७७ अन्वये मधील घटकांची पूर्तता केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने कडे दुर्लक्ष करून हयगईने अविचाराने भरधाव वेगात चालवुन ती यातील फिर्यादी यांचा मेव्हणा तुषार किसन होनमाने यास पाठीमागुन धडकमारून अपघात करून त्यांचे मरणास कारणीभुत झाला, ही बाब नि:संशयपणे सिध्द केलेली नाही.

**२२.** आरोपीवरील आरोप ज्या घटनेवर आधारीत आहेत, ती घटनाच पुराव्याअभावी अभियोगपक्षाने सिध्द न केल्याने सदरचे आरोप तंतोतंतपणे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी झाले आहेत, असे म्हणता येईल. यावरुन सदर घटनेशी आरोपीचा संबंध प्रस्थापित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे स्पष्ट होते. प्रस्तुत खटल्याबाबत पोषक असा पुरावा अभियोगपक्षाने न दिल्याने प्रस्तुत प्रकरणातून आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ बाबत :-</u>**

**२३.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडुन गुन्हा सिध्द करणारा कुठलाही पुरावा न्यायपटलावर आलेला नाही. सबब आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. सबब, वर नमुद चर्चेअंती मुददा क्र. ६ च्या अनुषंगाने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

**—: आ दे श :—**

| | |
|---|---|
| १. | आरोपी **करीम चांद सययद** याची भारतीय दंड विधान संहिता कलम भा.द.वि. २७९, ३०४ (अ), ३३७, सह मो. वा काय कलम १८४, १७७ अन्वये या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जातमुचलका व जामीन कदबा रदद करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीला असा निर्देश करण्यात येतो की, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४३७ (अ) प्रमाणे अपील कोर्टात हजर राहण्याविषयीचे बंधपत्र दयावे. |

**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित**

स्वाक्षारित/-
(श्रीमती. पी. जे. शेट्टी)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(८ वे कोर्ट), बेलापूर, नवी मुंबई.

ठिकाण : सी.बी.डी. बेलापूर
दि. २६/०५/२०२५